महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे यांचे कार्यालय
ठाणे – ४००६०१

Email ID: cp.thane.sbcommunal@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र:२५३४१४२५

क्रमांक/विशा/मनाई आदेश/१३९/२०२२ दि :-२३ /०६/२०२२

## महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ पोट कलम (१) व (३) अन्वये अधिसुचना

ज्याअर्थी, ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना इत्यादीकडून जनतेच्या विविध मागण्यांसाठी मोर्चे, आंदोलने, निदर्शने, घेराव, धरणे, सभा, उपोषणे इ. कार्यक्रमांचे आयोजन केले जाण्याची शक्यता आहे. तसेच सद्या विविध आंदोलने सुरु आहेत. त्याचप्रमाणे दि. २६/०६/२०२२ रोजी छत्रपती शाहू महाराज जयंती असा सण/उत्सव संपन्न होणार आहे.

सदर घटनांच्या अनुषंगाने माझी खात्री झाली आहे की, ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधीत राखण्याकामी प्रतिबंधक आदेश जारी करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी डॉ. सुधाकर पठारे, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर, आम्हास पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये असलेले अधिकार त्यांनी कार्यालयीन आदेश जावक क्रमांक **CP/SB/ORDERS/87/2022 DATE 07/04/2022** अन्वये प्रदान केल्याने त्या अधिकाराचा वापर करून ठाणे पोलीस आयुक्तालय परिसरात जिवीत व वित्त सुरक्षित राहण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी खालील कृत्यांना मनाई आदेश देत आहे.

१) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंड, बंदुका, लाठया किंवा शरीरास इजा करण्यासाठी वापरण्यात येईल अशी कोणतीही वस्तु बरोबर वाहून नेणे, बाळगणे, जमा करणे व तयार करणे.
२) दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बरोबर नेणे, जमा करणे व तयार करणे.
३) कोणताही दाहक किंवा स्फोटक पदार्थ आणि द्रव बाळगणे, बरोबर नेणे.
४) सार्वजनिक रितीने घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे इत्यादी.
५) कोणत्याही इसमाचे चित्राचे/प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढाऱ्यांच्या चित्राचे/प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे
६) सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल किंवा राज्यातील शांतता धोक्यात येईल किंवा ज्यामुळे राज्यशासन उलथून पडेल अशी भाषणे, हावभाव, चित्रफलक, प्रदर्शित करणे.
(७) पाच किंवा पाचापेक्षा अधिक लोकांनी एकत्र जमणे, जाहीर सभा घेणे, मिरवणुका काढणे, घोषणा, प्रतिघोषणा देणे इत्यादी कृत्ये.

वरिल मनाई आदेश खालील व्यक्तींना लागू राहणार नाहीत. 'जो कोणी इसम सरकारी नोकर आहे, किंवा ज्यास वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्य निमित्ताने शस्त्रे घेणे भाग पडेल, किंवा ज्यास अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याने सुट दिलेली आहे.

सोशलमिडियाप्रमुख
पोलीस उप आयुक्त,
आ.गु.शा. व सायबर सेल, ठाणे
आवक क्रमांक ९८०
दिनांक : २५/०६/२०२२

सदर आदेश खालील मिरवणुका व जमावास लागू राहणार नाहीत.

१) लग्न कार्यासाठी जमलेले लोक.
२) प्रेत यात्रा व अंत्यसंस्कारासाठी काढण्यात आलेल्या मिरवणुका.
३) सरकारी/निमसरकारी कामासाठी कोर्ट, कचेऱ्या येथे जमलेले लोक.
४) सरकारी संस्था, शैक्षणिक संस्था या ठिकाणी जमलेला जनसमुदाय.
५) पोलीस आयुक्त व त्यांनी प्रदान केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी परवानगी दिलेल्या सभा/मिरवणुका
६) सर्व शासकीय/निमशासकीय कर्मचारी हे कर्तव्य पार पाडीत असलेले ठिकाण.

सदर मनाई आदेश दिनांक २४/०६/२०२२ रोजी ००.०१ वाजेपासून दिनांक ०८/०७/२०२२ रोजी २४.०० वाजेपर्यंत अंमलात राहील. वरील मनाई आदेशाचा भंग करणाऱ्या विरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम १३५ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

दिनांक : २३ /०६/२०२२

शिक्का

( डॉ.सुधाकर पठारे )
पोलीस उप आयुक्त,विशेष शाखा
ठाणे शहर

प्रति,

१) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई, ( राजपत्रात प्रसिध्दीसाठी )
२) पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ ते ५, शवाशा, गुन्हे शाखा, आर्गुशा, मुख्यालय १ व २
३) सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, ठाणे आयुक्तालय, ठाणे शहर
४) सर्व पो.स्टे प्रभारी अधिकारी ठाणे शहर व सर्व शाखा, प्रभारी अधिकारी ठाणे शहर
५) जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे ( बातमी प्रसिध्दीसाठी )
६) समन्वय अधिकारी, ९ ए. एस. ( नोटीस प्रसिध्दीसाठी )

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य मुंबई
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई.
४) पोलीस आयुक्त, ठाणे शहर .
५) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
६) पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
७) अपर पोलीस आयुक्त, प्रशासन/गुन्हे/पूर्व-पश्चिम प्रादेशिक विभाग
८) जिल्हाधिकारी, ठाणे

( सर्व प्रभारी अधिकारी यांनी सदर आदेशाच्या प्रती पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील विविध सार्वजनिक ठिकाणी सहज दिसेल अशा रितीने लावून तसेच ध्वनी क्षेपकाद्वारे जाहीर करुन, त्यांचा प्रसार करावा व तशा नोंदी पोलीस ठाणे दैनंदिनीत घ्याव्यात. )